लघुलेखक (उच्च व निम्न श्रेणी) व लघुटंकलेखक (मराठी) चाळणी परीक्षा - 2012

परीक्षा दि:- 29-04-2012

**A**

CODE : **JRM**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

**BOOKLET NO.**

# प्रश्नपुस्तिका

## चाळणी परीक्षा / SCREENING TEST

## मराठी भाषा व बुद्धिमापन चाचणी

वेळ : $1\frac{1}{2}$ (दीड) तास

एकूण प्रश्न : 150

एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा

1. 'विघ्न' म्हणजे :

(1) अडचण (2) गोंधळ (3) गडबड (4) बडबड

2. मुलाच्या पराक्रमाने ऊर ____________ आला.

(1) फुटून (2) जड होवून (3) धडपडून (4) भरुन

3. 'समकालीन' म्हणजे काय ?

(1) भविष्यकाळ (2) भूतकाळ

(3) एकाच काळात असणारा (4) दुसऱ्याच काळात असणारा

4. भाषा म्हणजे काय ?

(1) विचार व्यक्त करण्याचे साधन (2) हावभाव व्यक्त करण्याचे साधन

(3) ध्वनी निर्माण करण्याचे साधन (4) संदेश निर्माण करण्याचे साधन

5. खालीलपैकी ऱ्हस्व स्वर कोणता ?

(1) आ (2) ऊ (3) ई (4) अ

6. 'अती' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता ?

(1) पुष्कळ (2) फार (3) कमी (4) जास्त

7. समाजात चांगला बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणारा ____________ .

(1) पुढारी (2) नेता (3) सुधारक (4) कारागीर

8. खाली दिलेल्या शब्दांपैकी शुद्ध शब्द ओळखा.

(1) दिपावली (2) दीपावली (3) दीपावलि (4) दिपावलि

9. 'अष्टावर्त' या संस्कृत शब्दातील मराठी अर्थ खालीलपैकी कोणता ?

(1) आठवडा (2) आठवण (3) अडखळणे (4) आटपाट

10. 'हातवारे' म्हणजे काय ?

(1) हात उचल (2) मुठ आवळणे

(3) हातावर वार करणे (4) हात हालवून इशारे करणे

**कच्च्या कामासाठी जागा**

**11.** मराठी भाषेचे लेखन आपण __________ लिपीत करतो.

(1) मोडी (2) देवनागरी (3) पाली (4) देवनवरी

**12.** खालील शब्दांपैकी शुद्ध शब्द कोणता?

(1) निलिमा (2) नीलिमा (3) निलीमा (4) नीलीमा

**13.** खाईन तर __________ .

(1) भरपेट (2) उपाशी (3) अर्धपोटी (4) तुपाशी

**14.** 'अर्थ' या शब्दाचा एक अर्थ 'आशय' असा होतो तर दुसरा अर्थ कोणता?

(1) वस्तू (2) पैसा (3) पाणी (4) यापैकी नाही

**खालील कविता वाचून त्यावर आधारित प्रश्न क्रमांक 15 ते 19 ची उत्तरे द्या.**

येतो भरुन ऊर होतात सूर वेडे
हे मायमातृभूमी गातो तुझे पवाडे

तीर्थस्वरूप पाणी कनक स्वरुप माती
पाना-फुला-फळांना ऋतुरंग मागताती
पवनास कस्तुरीचे देतात श्वास झाडे

जे मागतात शक्ती आभाळ पेलण्याची
देतेस त्यास आई उंची हिमालयाची
इतिहास घेई हाती त्यांचे बुलंद झेंडे

सामर्थ्य मानवांचे जागे करावयाला
आई, तुझ्या दुधाचे बळ लागते पणाला
देतेस तूच शक्ती होण्यास ध्येयवेडे

वाटे अनेक जन्मी व्हावे तुझेच बाळ
माझा दिवा जळावा सेवेत सर्वकाळ
ममचोघडे झडावे होऊन मातृवेडे

श्री. दि. इनामदार

**कच्च्या कामासाठी जागा**

15. कवीने कोणाचे गौरवगान गायिले आहे ?

(1) आईचे (2) बाबांचे (3) मातृभूमीचे (4) स्वत:चे

---

16. 'ऊर भरुन येतो' म्हणजे नेमके काय होते ?

(1) सूर वेडे होतात (2) ताकद येते

(3) सूर भरकटतात (4) गाणी सुचतात

---

17. वेडा होवून कवी काय गातो ?

(1) कविता (2) सिनेमागीत (3) चारोळी (4) पोवाडा

---

18. शक्ती कशासाठी मागतात ?

(1) बुलंद झेंडे घेण्यासाठी (2) लढण्यासाठी

(3) आभाळ पेलण्यासाठी (4) हिमालयाची उंची गाठण्यासाठी

---

19. आईच्या दुधाचे बळ पणाला का लागते ?

(1) युद्ध जिंकण्यासाठी (2) ध्येयवेडे होण्यासाठी

(3) मानवाचे सामर्थ्य जागे करण्यासाठी (4) शेती करण्यासाठी

---

20. 'ग्रंथकार', 'कुंभकार', 'पांथस्थ', 'द्विज' हे शब्द कोणत्या समासातील आहेत ?

(1) विभक्ती तत्पुरुष (2) अलुक् तत्पुरुष (3) उपपद तत्पुरुष (4) नञतत्पुरुष

---

21. खालीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा.

(1) परिक्षा (2) सुरू (3) सून (4) नागपुरास

---

22. 'पांढरे स्वच्छ दात मुखास शोभा देतात' या वाक्यातील उद्देश्य ओळखा.

(1) मुखास (2) शोभा (3) दात (4) पांढरे स्वच्छ

---

23. वाक्यरचनेचा प्रकार ओळखा

''पोटाला चिमटा बसला, की माणसाला नाना विद्या आपोआप सुचतात''.

(1) संयुक्त वाक्य (2) विध्यर्थी वाक्य (3) मिश्र वाक्य (4) केवल वाक्य

---

**कच्च्या कामासाठी जागा**

24. नामांच्या रूपात जो बदल किंवा विकार होतो त्यास व्याकरण शास्त्रात काय म्हणतात ?

(1) विकरण (2) विभक्ती (3) वचन (4) लिंग

25. 'महागाईस आळा घालावा' या वाक्याचे आज्ञार्थी वाक्य ओळखा.

(1) महागाईस आळा घालणे अशक्य. (2) महागाईस आळा घाला.

(3) महागाईस आळा घालता येईल ? (4) अबब ! केवढी ही महागाई !

26. अभ्यस्त शब्द सिद्धीच्या प्रकारातील शब्द ओळखा-

(1) दगडमाती (2) दंतपुराण (3) पुनर्जन्म (4) दगडबिगड

27. अधोरेखित शब्दाची विभक्ती सांगा -

'देवाजीने करुणा केली, भाते पिकुनी पिवळी झाली'

(1) प्रथमा (2) संबोधन (3) सप्तमी (4) षष्टी

28. 'घरोघरी मातीच्या चुली' या म्हणीला पर्यायी म्हण कोणती ?

(1) पळसाला पाने तीनच (2) तण खाई धन

(3) दिसताच पुरे सगळंच गिळे (4) ना नात्याची ना गोत्याची

29. संयुक्त वाक्य कोणते ?

(1) तो लवकर उठून व्यायाम करतो. (2) तो लवकर उठतो व तो व्यायाम करतो.

(3) जर तो लवकर उठला तर व्यायाम करतो. (4) तो लवकर उठल्यावर व्यायाम करतो.

30. खालीलपैकी शब्दाची कोणती जात विकारी नाही ?

(1) सर्वनाम (2) विशेषण (3) क्रियाविशेषण (4) नाम

31. नकारार्थी करा -

'तो खात्रीने क्रमांक पटकावील'.

(1) तो खात्रीने क्रमांक पटकावणार नाही. (2) त्याचे क्रमांक पटकावणे निश्चित नाही.

(3) तो जरुर क्रमांक पटकाविल. (4) तो क्रमांक पटकावल्या शिवाय राहणार नाही.

**कच्च्या कामासाठी जागा**

32. 'अशा जगास्तव काय झुरावे ?' या वाक्याचे विधानार्थी रुपांतर कोणते ?

(1) अशा जगासाठी झुरू नये. (2) अशा जगासाठी झुरावे.

(3) अशा जगासाठी झुरणार! (4) अशा जगासाठी कोण झुरणार ?

33. 'पुस्तक' हा शब्द मराठीत कोणत्या लिंगात वापरतात ?

(1) नपुंसकलिंग (2) पुल्लिंग (3) स्त्रीलिंग (4) पुल्लिंग व स्त्रीलिंग

34. विधान पूर्ण करा –

सारांशलेखन हे मूळ उताऱ्यातील शब्दसंख्येच्या ________ शब्दात करण्याची प्रथा आहे.

(1) दोन तृतीयांश (2) एक तृतीयांश (3) एक चतुर्थांश (4) एक पंचमांश

35. प्रयोग ओळखा :

'वडिलांनी मुलाला शाळेत घातले'.

(1) कर्तृकर्म संकर (2) कर्मभाव संकर

(3) कर्तृकर्मभाव संकर (4) कर्तरी प्रयोग

**खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्न क्रमांक 36 ते 40 ची उत्तरे द्या.**

आजच्या काळात सामाजिक व आर्थिक विकासाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. व्यक्ती व समाजात परिवर्तन घडविणारे हे एक साधनही मानले जाते. बर्ट्रान्ड रसेलनाही असेच वाटत होते, की शिक्षणाने व्यक्ती बदलेल आणि व्यक्ती बदलली की समाजही बदलेल. प्रारब्धवादी समाजव्यवस्थेला परिवर्तन कधीही मान्य नसते. स्थितिशीलता ही तिची आदिप्रेरणा असते. आधुनिक काळातील गतिमानता या स्थितिशीलतेला हादरा देते. गतिमानता हे आधुनिक काळाचे मानचिन्ह आहे. त्याचा परिणाम शिक्षणासारख्या एका महत्त्वाच्या घटकावर झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे साधन मानले.

शिक्षण हे माणसाला विचार देते. त्याच्या बुद्धीची जोपासना करते. त्याच्या अस्तित्वाची त्याला जाणीव करुन देते. अस्तित्वाची जाणीव ही मानवी जीवनातील मूलभूत जाणीव आहे. डॉ. बाबासाहेब तिचे महत्त्व पटवून देताना म्हणतात, की 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो.''

36. शिक्षणाच्या अभावामुळे माणूस कसा बनतो ?

(1) अल्पायुषी (2) दीर्घायुषी (3) निर्बुद्ध (4) हुशार

**कच्च्या कामासाठी जागा**

37. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे कशाचे साधन मानले आहे ?

(1) सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे (2) प्रारब्धवादी बनवायचे
(3) स्थितिशील बनवायचे (4) व्यक्तीला गुलाम बनवायचे

---

38. लेखकाने आधुनिक काळाचे कोणते लक्षण सांगितले आहे ?

(1) प्रारब्धवादी (2) स्थितिशीलता (3) गतिमानता (4) अज्ञानवादी

---

39. अस्तित्वाची जाणीव कशामुळे होते ?

(1) उपासमारीने (2) शिक्षणाने (3) अज्ञानामुळे (4) गतिमानतेमुळे

---

40. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

(1) व्यक्ती व शिक्षण (2) समाज व शिक्षण (3) शिक्षणाचे सामर्थ्य (4) माणसाचे अस्तित्व

---

41. केलेले उपकार विसरणारा ________.

(1) उपद्रवी (2) कृतघ्न (3) अपकारी (4) कृतज्ञ

---

42. मिश्र वाक्य कोणते ?

(1) विशालकडून अपमानित झालेला विकास चिडला.
(2) विशालने अपमान केल्यामुळे विकास चिडला.
(3) विशालने अपमान केला म्हणून विकास चिडला.
(4) विकास चिडला, कारण विशालने त्याचा अपमान केला.

---

43. वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द म्हणजे –

(1) विशेषण (2) क्रियाविशेषण (3) क्रियापद (4) नाम

---

44. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा –

शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात त्यांना ________ शब्द म्हणतात.

(1) साधित (2) प्रत्ययघटित (3) सिद्ध (4) उपसर्गघटित

---

**कच्च्या कामासाठी जागा**

45. नामाच्या उपप्रकारांपैकी फक्त __________ अनेकवचन होते.

(1) विशेषनामाचेच (2) धर्मवाचक नामाचेच

(3) भाववाचक नामाचेच (4) सामान्य नामाचेच

46. वालचंद हिराचंद यांना __________ म्हणत.

(1) उद्योगी (2) कारखानदार (3) व्यावसायिक (4) उद्योगमहर्षी

47. खालीलपैकी केवल वाक्य ओळखा-

(1) वारा सुटला आणि पाऊस गेला. (2) पाऊस पडावा म्हणून शेतकरी वाट पाहत होते.

(3) आज पाऊस पडावा. (4) तू खेळ पण अभ्यास करत जा.

48. 'भाकरी', 'तूप', 'कुंची', 'अण्णा', 'ताई' हे शब्द खालीलपैकी कोणत्या भाषेतून मराठीत आलेली आहेत?

(1) गुजराथी (2) हिन्दी (3) कानडी (4) अरबी

49. 'अणुरेणूहुन थोकडा । तुका आकाशा एवढा' यातील अलंकार ओळखा -

(1) चेतनगुणोक्ती (2) भ्रांतिमान (3) विरोधाभास (4) सार

50. 'कृष्ण' या शब्दातील वर्णरचना खालीलपैकी कशी असेल?

(1) क्+ऋ+ष्+ण्+अ (2) क्+रु+श्+न्+आ (3) क्+रू+ष्न+अ (4) क्+रु+स्+न्+अ

51. प्रयोग ओळखा-

'त्याने चोरास पकडले'.

(1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग

(3) भावे प्रयोग (4) कर्तृ-कर्म संकर प्रयोग

52. सामासिक शब्द ओळखा -

(1) पेरणी (2) राजपुत्र (3) दैव (4) अडकित्ता

53. 'पापणीत गोठविली मी नदी आसवांची' - अलंकार ओळखा.

(1) अतिशयोक्ती (2) रूपक (3) व्यतिरेक (4) दृष्टांत

**कच्च्या कामासाठी जागा**

**54.** पुढील पद्य पंक्तीत कोणता रस आहे ?

'जुने जाऊ द्या मरणा लागुन,

जाळुनी किंवा पुरुनी टाका!'

(1) करुण (2) रौद्र (3) हास्य (4) बीभत्स

---

**55.** अधोरेखित शब्दाचा समास सांगा.

रामचंद्र पंचवटीत राहत होते.

(1) अव्ययीभाव (2) बहुव्रीही (3) द्विगू (4) कर्मधारेय

---

**खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 56 ते 61 ची अचूक उत्तरे द्या.**

दु:खे येतात ती आपली कसोटी पाहण्यासाठी येतात. त्यावेळी न डगमगणे हाच खरा पुरुषार्थ. भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याखेरीज सोन्याला तेज चढत नाही किंवा टाकीचे घाव सोसल्यावाचून दगडाला देवत्वही येत नाही हे आपणाला माहीत नाही काय ? पैलू पाडल्यावाचून हिऱ्याला किंमत येत नाही. आपणावर कोसळणारी दु:खे ही अशीच आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्यासाठी निर्माण झाली आहेत असे का समजू नये ? शिवाय असे पहा. जगात दु:खे आहेत म्हणून सुखाची किंमत आपणास कळते ना ? जगात अंधारी रात्र आहे म्हणून चंद्राला महत्त्व. नुसते गोड जेवण जेवण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे काय ? नुसत्या गोडाने तोंडाला कशी मिठी बसते हे तुम्हास माहीत आहेच. परीक्षेसाठी मरमर कष्ट केल्यानंतर निकालाच्या आनंदाची खरी गोडी आपणास कळते. असे जर आहे तर वर्तमानकाळाच्या दु:खाबाबत आपण कुरकुर का करावी ?

---

**56.** या उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

(1) वर्तमानकाळाची कुरकुर (2) दु:खाचे पैलू

(3) खरा पुरुषार्थ (4) सुखाची किंमत

---

**57.** खरा पुरुषार्थ कोणता ?

(1) सुख आल्यावर न डगमगणे. (2) दु:खे आल्यावर न डगमगणे.

(3) दु:खाबद्दल कुरकुर करणे. (4) सुखाचे दिवास्वप्न पाहणे.

---

**58.** सुखाची किंमत कशामुळे कळते ?

(1) सोन्यामुळे (2) हिऱ्यामुळे (3) दु:खामुळे (4) गोडव्यामुळे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

59. परीक्षेच्या निकालाच्या आनंदाची गोडी कधी कळते ?

(1) परीक्षेसाठी मरमर कष्ट करुन निकाल लागल्यानंतर.

(2) परीक्षेसाठी काहीही अभ्यास न केल्यावर.

(3) परीक्षेत कॉपी केल्यावर.

(4) परीक्षेत नापास झाल्यावर.

---

60. आपली कसोटी कोण पाहते ?

(1) वर्तमान काळ (2) सुख (3) दु:ख (4) भविष्यकाळ

---

61. माणसे कशाबद्दल कुरकुर करतात ?

(1) सुख (2) दु:ख (3) दैन्य (4) दारिद्रय

---

62. साध्या भविष्यकाळाचे वाक्य सांगा –

(1) त्याचे श्रम कमी आहेत. (2) त्याचे श्रम कमी होतात.

(3) त्याचे श्रम कमी होते. (4) त्याचे श्रम कमी होतील.

---

63. वाढत्या महागाईमुळे सामान्य माणसाची कंबर __________ .

(1) कसली (2) खचली (3) तुटली (4) बांधली

---

64. 'चर्पट पंजरी' या अलंकारिक शब्दाचा अर्थ सांगा –

(1) अर्थावीण पाठांतर (2) लांबत जाणारे काम (3) वायफळ बडबड (4) खरडपट्टी काढणे

---

65. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा –

प्रभा झपझप चालते.

(1) अकर्मक कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग

(3) सकर्मक कर्तरी प्रयोग (4) अकर्मक भावे प्रयोग

---

66. पुढीलपैकी तालव्य वर्ण कोणता ?

(1) ट् (2) ओ (3) च् (4) ण्

---

**कच्च्या कामासाठी जागा**

67. घोड्याला येथे बांधतात.

(1) झाडाला (2) तबेल्यात (3) गोठ्यात (4) पडवीत

---

68. 'कावळा' या शब्दाचा समानार्थी शब्द सांगा.

(1) काक (2) कटाक्ष (3) बगळा (4) कान

---

69. 'बछडा' या शब्दाचे स्त्री लिंगी रूप कोणते ?

(1) वाघीण (2) बछडी (3) भाटी (4) हंसी

---

70. नेमका अर्थ सांगा –

'भाकड कथा'.

(1) माकड कथा (2) निरर्थक गोष्ट (3) भाकरीची गोष्ट (4) गप्पा गोष्टी

---

71. वाक्य प्रकार ओळखा –

'आम्ही जातो आमच्या गावा'.

(1) मिश्र (2) केवल (3) संयुक्त (4) जोडवाक्य

---

72. पुढील शब्दाचा समानार्थी शब्द सांगा –

पाणि

(1) जल (2) थेंब (3) हात (4) नदी

---

73. खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा –

विधान-शेतातून जाताना काटे बोचू नयेत __________ मी काळजी घेत असे.

(1) म्हणजे (2) जेव्हा (3) म्हणून (4) की

---

74. खालील पद्य रचना कोणती आहे ?

आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे।

तोषोनि मज द्यावे। पसायदान हे।।

(1) अभंग (2) दोहे (3) ओवी (4) भारूड

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**75.** कर्मणी प्रयोगाचे वाक्य सांगा –

(1) सचिनने शतक काढले. (2) सचिन चेंडू सीमापार टोलवतो.

(3) सचिनने खेळावे. (4) सचिनने धावावे.

---

**खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 76 ते 82 ची अचूक उत्तरे लिहा.**

शिशिर ऋतूतल्या एका सायंकाळी पु.ल.देशपांडे यांच्या 'रुपाली' त गप्पांना बहर आला होता. जीवाभावाचे भेटणे सुखावले होते. भाई नुकतेच बंगालातून परिक्रमा करून आल्यामुळे रवींद्रनाथांचा विषय ताजा होता. रवींद्रनाथांचं संगीत, नाटक, शिक्षणदृष्टी, बंगाली भाषेचं वैभव असे कितीतरी विषय. सुनीताबाई अधूनमधून एखादा संदर्भ देत होत्या. मैफल रंगली होती आणि अकस्मात माझं लक्ष बैठकीतल्या गुलाबकुंडीकडे गेलं. मी विचारलं, 'भाई ही गुलाबकुंडी काही विशेष म्हणून इथे ठेवली का?' आणि मग गवयाचा मनासारखा सूर लागावा, त्याप्रमाणे काहीसे डोळे मिटून पण अनावर होऊन ते म्हणाले, 'गंगाधरपंत हा बिनकाट्याचा गुलाब आहे, बाबा आमट्यांच्या आनंदवनातील आंधळ्या मुलांसाठी. आनंदवनात केवळ महारोगी नाहीत तर असहाय्य, वृद्ध आणि आंधळी मुलंही आहेत. आंधळ्या मुलांनी गुलाबाची वर्णने ऐकली होती पण तो असतो कसा? गुलाबाच्या झाडाला एका आंधळ्या मुलानं स्पर्श करून पाहिला पण नंतर त्याच्या हाताला रक्त आल होतं, काटे बोचले होते. बाबांनी हे पाहिलं आणि ते कळवळले आणि मग माझ्या मनान घेतलं की, त्या मुलांसाठी बिनकाट्याचा गुलाब घ्यायचा. खूप शोध घेतला आणि शेवटी हे झाड हाती आलं. मुलांना हा बिनकाट्याचा गुलाब गोंजारू दे, भरभरून स्पर्श करु दे. लवकरच त्याची आनंदवनात बोळवण करायचीय'.

---

**76.** 'रूपाली' हे नाव कोणत्या साहित्यिकांच्या घराचे आहे?

(1) पु.ल. देशपांडे (2) प्र.के. अत्रे (3) शांता शेळके (4) गंगाधर गाडगीळ

---

**77.** बिनकाट्याच्या गुलाबाची बोळवण पु.ल.देशपांडे यांना कुठे करावयाची आहे?

(1) अनाथालयात (2) आनंदवनात (3) बालोद्यानात (4) आनंद विहारात

---

**78.** उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

(1) बिनकाट्याचा गुलाब (2) आनंद विहार

(3) बंगालची परिक्रमा (4) साहित्यिक गप्पा

---

**79.** मैफल रंगली असताना लेखकाचे लक्ष कुणीकडे गेले?

(1) पुस्तकांकडे (2) बगीच्याकडे (3) झाडाकडे (4) गुलाबकुंडीकडे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**80.** गुलाबाच्या झाडाला आंधळ्या मुलाने स्पर्श केल्यावर काय झाले ?

(1) रक्त आले (2) काटे बोचले

(3) खरचटले (4) हाताला जखम झाली

---

**81.** पु.ल. देशपांडे बंगालमधून परिक्रमा करुन आल्यानंतर कोणत्या विषयावर बोलत होते ?

(1) सुभाषचंद्र (2) सत्यजित (3) शरच्चंद्र (4) रवीन्द्रनाथ

---

**82.** पु.ल. देशपांडे यांच्या पत्नीचे नाव सांगा ?

(1) साधना (2) आरती (3) सुनीता (4) विजया

---

**83.** योग्य पर्यायाची निवड करा.

नदी : प्रवाह : : समुद्र : ?

(1) ओहोटी (2) लाटा (3) प्रवाह (4) भरती

---

**84.** मला एका दोरखंडाचे समान लांबीचे 11 तुकडे करावयाचे आहेत. त्यासाठी प्रथम त्याची दोन्ही टोके एकमेकांशी जुळवून घेतली तर मला हवे असलेले 11 तुकडे मिळविण्यासाठी तो दोरखंड मी किती ठिकाणी कापावा ?

(1) 5 (2) $5\frac{1}{2}$ (3) 6 (4) 10

---

**85.** 'मानवता' या शब्दाचे लिंग ओळखा–

(1) स्त्रीलिंग (2) पुल्लिंग

(3) नपुसकलिंग (4) पुल्लिंग व नपुसकलिंग

---

**86.** सहसंबंध पूर्ण करा –

4 : 27 : : _____ : 125

(1) 36 (2) 64 (3) 25 (4) 16

---

**87.** सहसंबंध दर्शविण्यासाठी पर्याय निवडा –

81 : 6561 : : _____ : 6241

(1) 78 (2) 79 (3) 82 (4) 83

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**88.** खालीलपैकी विजोड पद कोणते ?

(1) N I P I N (2) T A R T A (3) C L I L C (4) P T E T P

---


**89.** विसंगत घटक निवडा -

रेडियम, पोलोनियम, थोरियम, सोडियम.

(1) पोलोनियम (2) रेडियम (3) थोरियम (4) सोडियम

---

**90.** प्रश्नचिन्हाच्या जागी संख्या निवडा -




(1) 144 (2) 49 (3) 121 (4) वरीलपैकी नाही

---

**91.** खालील अंकमालिकेत नजीकच्या दोन अंकाच्या किमतीतील फरक 3 आहे. अशा अंक जोड्या किती ?

961425914996531

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

---

**92.** TAKE : EKAT : : LAOG : __?__

(1) OGAL (2) GOAL (3) LGOA (4) GAOL

---

**93.** उत्कट भावना व्यक्त करताना त्या शब्दाच्या शेवटी कोणते चिन्ह वापरतात ?

(1) पूर्णविराम ( . ) (2) उद्‌गार चिन्ह ( ! )

(3) अवतरण चिन्ह (“ ”) (4) अपसारण चिन्ह ( - )

---

**94.** ‘अ’ हा ‘ब’ पेक्षा 2 वर्षांनी लहान आहे ‘ब’ हा ‘क’ च्या दुप्पट वयाचा आहे. ‘क’ चे वय 8 वर्ष आहे. तर ‘अ’ चे वय किती ?

(1) 10 (2) 16 (3) 14 (4) 15

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**95.** 'मेतकूट जमणे' म्हणजे काय ?

(1) मैत्री दृढ होणे. (2) मैत्री तुटणे.
(3) मैत्रीत अस्थिरता वाढणे. (4) मेथीचे कूट जेवणात वापरणे.

---

**96.** खालीलपैकी कोणता शब्द उभयान्वयी अव्यय आहे ?

(1) पेक्षा (2) प्रती (3) पर्यंत (4) आणि

---

**97.** पुढील संकल्पनांच्या गटात बसणारा पर्याय निवडा.

तोटा, खरेदी, नफा _____ .

(1) व्याज (2) मुद्दल (3) विक्री (4) जमाखर्च

---

**98.** $\sqrt{\sqrt{\sqrt{\sqrt{6561}}}} = ?$

(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

---

**99.** पाण्याने भरलेली दंडगोलाकार पारदर्शक बाटली पुढीलपैकी कोणत्या संख्येवर आडवी ठेवून संख्या पाहिली असता तिच्यात फरक पडणार नाही.

(1) 81018 (2) 89168 (3) 80180 (4) 801018

---

**100.** खालील संख्यामालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल ?

150, 120, 95, 75, __?__ , 50, 45.

(1) 70 (2) 65 (3) 60 (4) 55

---

**101.** खालील वर्णमालिकेतील प्रश्नचिन्हांच्या जागी येणारे अंक ओळखा. त्या अंकापासून तयार होणारी सर्वात मोठी संख्या कोणती ?

| C | D | I | F | H | G |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | ? | ? | ? | ? |

(1) 9 6 8 7 (2) 9 7 8 6 (3) 9 8 7 6 (4) 9 8 6 7

---

**102.** क्रमिका पूर्ण करा –

BCA, FGE, JKI, NOM, __?__

(1) KLJ (2) LNM (3) MOP (4) RSQ

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**103.** असे कधी म्हणतात ?

'नाकापेक्षा मोती जड'.

(1) नाक फाटते तेव्हा
(2) मोठ्या पेक्षा लहान वरचढ होतो तेव्हा
(3) सर्दी झाल्यावर
(4) केव्हाही

---

**104.** पुढील शब्दांतील गाळलेल्या जागी कोणते वर्णाक्षर लिहिले तर ते शब्द अर्थपूर्ण होतील ?

(a) P_wer (b) Br_ther (c) Wr_ng (d) F_rce

(1) a (2) e (3) o (4) i

---

**105.** पुढीलपैकी कोणती दोन विधाने सोने हे चांदीपेक्षा जड आहे हा निष्कर्ष काढण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत ?

(a) चांदी जस्तापेक्षा जड आहे.
(b) सोने शिशापेक्षा जड आहे.
(c) शिसे चांदीपेक्षा जड आहे.
(d) लोखंड जस्तापेक्षा हलके आहे.

(1) (b), (d) (2) (c), (d) (3) (b), (c) (4) (a), (d)

---

**106.** खालील पर्यायांतील विजोड संख्या ओळखा.

(1) 35 (2) 48 (3) 63 (4) 81

---

**107.** 'उन्हे उतरणे' म्हणजे __________ .

(1) सकाळ होणे (2) दुपार होणे (3) संध्याकाळ होणे (4) रात्र होणे

---

**108.** गटात न बसणारी संख्या जोडी ओळखा –

9 ___ 12, 10 ___ 13, 11 ___15, 12 ___ 15

(1) 9 ___ 12 (2) 10 ___ 13 (3) 11 ___ 15 (4) 12 ___ 15

---

**109.** जर 420886 चा संकेत BALOON असेल तर 840260 चा संकेत काय ?

(1) LANBLO
(2) OBLANL
(3) BLDANO
(4) वरीलपैकी एकही नाही

---

**110.** A व B ह्या दोघी बहिणी आहेत C ही B ची सासू तर D हा C चा एकुलता एक मुलगा आहे तर A ही D ची कोण ?

(1) मेहुणी (2) मावशी (3) बहीण (4) काकी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

111. पुढील सर्व संख्यांतील अंकांची अदलाबदल केल्यास कोणती संख्या सर्वात मोठी संख्या देईल ?

34, 43, 79, 87

(1) 43 (2) 34 (3) 79 (4) 87

---

112. एका धावण्याच्या शर्यतीत माधवी ही करुणाच्या पुढे होती आणि काजल ही मानसीच्या पुढे होती पण करुणा आणि काजल बरोबर धावत होत्या. तर सर्वात पुढे कोण असेल ?

(1) माधवी (2) करुणा (3) काजल (4) मानसी

---

113. खालील इंग्रजी अक्षरमालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते अक्षर येईल ?

U, S, P, L, _?_, A

(1) F (2) G (3) H (4) K

---

114. पुढीलपैकी वेगळी आकृती कोणती ?

1. TOT 2. NON 3. BOB 4. VOV

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

---

115. 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला'– रस ओळखा –

(1) करुण (2) शांत (3) भयानक (4) अद्भुत

---

116. एका सांकेतिक भाषेत 'PRACTICE' हा शब्द 'PARTCCIE' असा लिहिला जातो तर त्या प्रकारे TRAINS हा शब्द कसा लिहिला जाईल ?

(1) TARINS (2) TANRIS (3) TARNIS (4) TAIRNS

---

117. समानार्थी नसलेला शब्द निवडा.

(1) ललना (2) नर (3) नारी (4) वनिता

---

118. खालील वाक्यापैकी शक्य क्रियापदाचे उदाहरण कोणते ?

(1) आई त्या मुलीला हसविते. (2) मला दररोज वीस मैल चालवते.

(3) मुलांनी सतत खेळू नये. (4) मला घरी पोचण्यापूर्वीच सांजावले.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

119. पुढील अपुर्णांक चढत्या क्रमाने मांडल्यास प्रथम कोणता अपुर्णांक लिहाल ?

$\frac{16}{21}, \frac{6}{7}, \frac{4}{7}, \frac{15}{11}$

(1) $\frac{16}{21}$ (2) $\frac{6}{7}$ (3) $\frac{4}{7}$ (4) $\frac{15}{11}$

---

120. 62 विद्यार्थ्यांनी विज्ञान हा पर्याय निवडला. 43 विद्यार्थ्यांनी गणित हा पर्याय निवडला. यातील 32 विद्यार्थ्यांनी गणित व विज्ञान हे दोन्ही पर्याय निवडले तर विज्ञान किंवा गणित किंवा दोन्ही विषय निवडणारे एकूण विद्यार्थी किती ?

(1) 71 (2) 72 (3) 73 (4) 74

---

121. पुढीलपैकी कोणता रचना प्रकार छंद नाही ?

(1) ओवी (2) अभंग (3) अनुष्टुभ (4) फटका

---

122. 'कोण, काय, कोणी, कोणाला', ही सर्वनामे सर्वनामाच्या कोणत्या प्रकारात मोडतात ?

(1) दर्शक सर्वनामे (2) संबंधी सर्वनामे

(3) प्रश्नार्थक सर्वनामे (4) आत्मवाचक सर्वनामे

---

123. संयुक्त वाक्य कोणत्या अव्ययानी जोडली जातात ?

(1) शब्दयोगी अव्यय (2) केवल प्रयोगी अव्यय

(3) उभयान्वयी अव्यय (4) क्रियाविशेषण अव्यय

---


124. खाली दिलेले वाक्य कोणत्या शब्दशक्तीतील आहे ?

वाक्य – "समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत".

(1) अभिधा (2) लक्षणा (3) व्यंजना (4) गौणी लक्षणा

---

125. कोणती संख्या फक्त इंग्रजी बोलणाऱ्या व्यक्ती दर्शविते ?




अ → इंग्रजी भाषिक
ब → हिन्दी भाषिक
क → मराठी भाषिक

(1) 4 (2) 3 (3) 1 (4) 2

---

**कच्च्या कामासाठी जागा**

126. 'खाऊन टाक' हा शब्द क्रियापदाच्या कोणत्या प्रकारात मोडतो ?

(1) सकर्मक क्रियापद (2) अकर्मक क्रियापद (3) संयुक्त क्रियापद (4) सहाय्यक क्रियापद

---

127. समूहातील विजोड पद ओळखा -

EV, AZ, JQ, LO

(1) EV (2) AZ (3) JQ (4) LO

---

128. एका घनाच्या प्रत्येक पृष्ठास स्वतंत्र रंग दिला आहे. वरच्या पृष्ठभागास काळा रंग आहे. तांबडा व पिवळा यांच्यामध्ये हिरवा रंग असून काळा व पांढरा यांच्यामध्ये निळा रंग आहे तर -

निळ्या रंगाच्या विरुद्ध बाजूस कोणता रंग आहे ?

(1) हिरवा (2) पिवळा (3) पांढरा (4) काळा

---

129. खालीलपैकी किमतीने सर्वात मोठा अपूर्णांक कोणता ?

$\frac{4}{5}$ $\frac{5}{4}$ $\frac{48}{60}$ $\frac{72}{60}$

(1) $\frac{4}{5}$ (2) $\frac{5}{4}$ (3) $\frac{48}{60}$ (4) $\frac{72}{60}$

---

130. क्रमाने येणाऱ्या सात अंकांची बेरीज बेचाळीस आहे. तर त्यातील मधोमध येणारी संख्या कोणती ?

(1) 1 (2) 2 (3) 5 (4) 6

---

131. तीन संख्यांचा गुणाकार त्यांच्या बेरजेएवढाच आहे तर त्या संख्या कोणत्या ?

(1) 1, 3, 4 (2) 1, 3, 3 (3) 1, 2, 3 (4) 1, 2, 2

---

132. 'त्या वीराच्या मृत्यूने महात्माही हळहळला', या वाक्यातील 'वीर' हे __________ नाम आहे.

(1) सामान्य (2) भाववाचक (3) जनसमुदाय (4) विशेष

---

133. क्रमिका पूर्ण करा -

$\frac{11}{K}, \frac{15}{O}, \frac{19}{S}, \frac{?}{?}$

(1) $\frac{23}{U}$ (2) $\frac{23}{X}$ (3) $\frac{23}{T}$ (4) $\frac{23}{W}$

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**134.** शर्वरी हिचा जन्म शनिवार 4 सप्टेंबर, 1993 रोजी झाला तर तिचा तिसरा वाढदिवस कोणत्या वारी आला असेल ?

(1) बुधवार (2) गुरुवार (3) मंगळवार (4) सोमवार


---

**135.** TELEVISION चे संकेतांतर 1 - 2 - 3 - 2 - 4 - 5 - 6 - 5 - 7 - 8 मध्ये केले तर 3 - 7 - 1 - 5 - 7 - 8 हे कोणत्या शब्दाचे संकेतांतर आहे ?

(1) VISION (2) LESION (3) VICTOR (4) LOTION

---

**136.** खालील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा –




(1) 750 (2) 625 (3) 205 (4) 230

---

**137.** 20202 ला 25 ने गुणल्यावर गुणाकार किती येतो ?

(1) 50050 (2) 55055 (3) 505050 (4) 55550

---

**138.** RAIL हा शब्द OXFI असा लिहिला तर CARE हा शब्द कसा लिहाल ?

(1) AXOB (2) ZXOB (3) ZXPB (4) ZYPB

---

**139.** खालील दिलेल्या पर्यायामधून प्रश्न चिन्हाच्या जागी येणारे वर्णाक्षर शोधा –

Z W T Q N __?__.

(1) O (2) K (3) P (4) L

---

**140.** मनोहर मूर्तीसमोर हात जोडून उभा होता त्याच्या उजव्या हाताला उत्तर दिशा होती तर मूर्तीचे तोंड कोणत्या दिशेला असेल ?

(1) पश्चिम (2) पूर्व (3) दक्षिण (4) आग्नेय

---

**141.** 'आगीत तेल ओतणे' या म्हणीचा अर्थ काय ?


(1) आग भडकविणे (2) भांडण वाढविणे

(3) आगीत लाकडे टाकणे (4) आगीत ज्वालाग्रही वस्तू टाकणे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**142.** रचनाशोध घेऊन प्रश्नचिन्हासाठी पर्याय निवडा.




---

**143.** पुढीलपैकी एक विधान **चुकीचे** आहे. ते कोणते ?

(1) एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही.

(2) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप केव्हा-केव्हा होत नाही.

(3) देशवाचक विशेषनामांचे केव्हा-केव्हा सामान्यरूप होत नाही.

(4) अनेकवचनी शब्दाच्या सामान्यरूपावर नेहमी अनुस्वार नसतो.

---

**144.** एका संख्येला 7 ने भागल्यास 5 उरतात व 8 ने भागल्यास 7 उरतात. तर ती संख्या कोणती ?

(1) 39 (2) 47 (3) 40 (4) 52

---

**145.** सुसंगत पर्याय निवडा –

घड्याळ : वेळ तर __________ : : दिशा.

(1) वात कुक्कुट (2) सुकाणू (3) पवनचकी (4) होकायंत्र

---

**146.** खालीलपैकी कोणत्या विभक्तीचे प्रत्यय सारखे आहेत ?

(1) प्रथमा-द्वितीया (2) पंचमी-षष्ठी (3) द्वितीया-चतुर्थी (4) द्वितीया-तृतीया

---

**147.** पुढील समूहातील विसंगत घटक कोणता ?

बदक, गरुड, वाघूळ, चिमणी.

(1) बदक (2) गरुड (3) वाघूळ (4) चिमणी

---

**148.** आयताकाराची परिमिती 18 सें.मी. असून त्याच्या बाजूच्या लांबी पूर्ण संख्या आहेत ? तर अशा मोठ्यात मोठ्या आयताचे क्षेत्रफळ किती ?

(1) 18 (2) 20 (3) 14 (4) 8

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**149.** 'शहाण्याला मार शब्दाचा' या म्हणीचा अर्थ ओळखा.

(1) शहाण्याला छडीने मारावे लागते.

(2) शहाण्याला शब्दाने मारावे लागते.

(3) शहाण्याला शब्दाने सांगितले की त्याला उमजते.

(4) शहाणे अक्षरश: वेडे असतात.

---

**150.** प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता अंक येईल ?

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | 8 | ? | 4 |
| 8 | 4 | 5 | 3 |
| 3 | 5 | 4 | 8 |
| 4 | 3 | 8 | 5 |

(1) 4 (2) 3 (3) 2 (4) 6

---

-oOo-

**कच्च्या कामासाठी जागा**

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदू कोण?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र.क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**